**गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार**
**<u>योजना राबविण्याबाबत.</u>**
**विभागीय सनियंत्रण समिती स्थापन करणेबाबत**

# महाराष्ट्र शासन
## जलसंधारण विभाग
**शासन निर्णय क्रमांकः गामूध-२०१७/प्र.क्र.१३४ / जल- २०**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १५ जून, २०१७

**<u>पहा</u>:** १) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग,क्रमांक गामूध- २०१७/ प्र.क्र.१३४/ जल- १, दिनांक ६ मे, २०१७.
२) शासन शुध्दीपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक गामूध- २०१७/ प्र.क्र.१३४/ जल- १ दिनांक १५ मे, २०१७.

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यातील २५० हेक्टर सिंचन क्षमता पर्यंतच्या धरणांतील गाळ काढणे व तो शेतात वापरणे यासाठी राज्यामध्ये गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्यात येत असून याबाबत शासन निर्णय उपरोक्त संदर्भित क्रमांक (१) नुसार दिनांक ६ मे, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. उक्त शासन निर्णयातील परिच्छेद १० नुसार सदर योजनेच्या अंमलबजावणी करीता राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर समित्या गठीत करण्यात आलेल्या असून विभागीय स्तरावर सनियंत्रण समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक गामुध २०१७ / प्र.क्र. १३४/ जल- १ दिनांक ६ मे, २०१७ मधील परिच्छेद १० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या सनियंत्रण समित्यामध्ये खालील प्रमाणे विभागीय समिती स्थापन करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त | - | अध्यक्ष |
| २. | विभागीय कृषी सहसंचालक | - | सदस्य |
| ३. | अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण मंडळ) | - | सदस्य |
| ४. | अधिक्षक अभियंता, जलसंपदा | - | सदस्य |
| ५. | उपसंचालक भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | - | सदस्य |
| ६. | उप आयुक्त (विकास) | - | सदस्य |
| ७. | उप आयुक्त (रोहयो) | - | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :-** जिल्हास्तर व तालुकास्तर समित्यांकडे सोपविण्यात आलेल्या जबाबदारीचे सनियंत्रण ठेवणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्यांचा संकेतांक २०१७०६१५१२१९०४९६२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c4ed7503121d5b275ec2c70be938333731cf94fc8d02a44089760242dc07e56, cn=Vinod S Wakhare
Date: 2017.06.15 13:09:19 +05'30'

**( वि.सि.वखारे )**
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
४) सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य.
५) मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
६) मा.राल्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई
९) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई ३२
१०) सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) मंत्रालय,मुंबई ३२
११) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे ४११ ००१
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे ४११ ००१
१४) प्रधान मुख्य वनसरंक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
१५) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण),पुणे
१६) मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर
१७) संचालक,महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
१८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी/ अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे
२०) महासंचालक, माहिती व जलसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३) महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता ),
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
२६) सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
२७) सर्व उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय

२८) सर्व विभागीय कृषि सह संचालक
२९) सर्व अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ
३०) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
३१) सर्व कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण )
३२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३३) सर्व मंत्रालयीन विभाग
३४) सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
३५) नियोजन विभाग/ वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
३६) निवड नस्ती जल २०.